MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## चेंगराचेंगरीनंतर महाकुंभ मेळ्यात अग्नीतांडव!
## १५ टेन्ट जळून खाक

**प्रतिनिधी** । प्रयागराज

प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यात पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाले आहेत. तसेच लाखो रुपयांचं मोठं नुकसान देखील झालं आहे. महाकुंभाच्या सेक्टर २२ मध्ये ही भीषण आग लागली आहे. त्यामुळे घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. या जाळपोळीत अनेक तंबू जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून आग विझवण्यास सुरुवात केली. सेक्टर २२ मधील झुशी परिसरातील छतनांग घाटाजवळ असलेल्या नागेश्वर पंडालमध्ये ही आग लागली आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१३६ | शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -136 | FRIDAY DT.31 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# ... तर दिवसा मुडदे पडतील

## नामदेव शास्त्रींच्या वक्तव्यावर धनंजय देशमुख संतापले, म्हणाले, आमची मानसिकता काय असेल

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलंच तापलं असून राजकीयनंतर आता अध्यात्मिक संत, महंतांनीही याप्रकरणात उडी घेतली आहे. राज्याचे अन्नपुरवठा मंत्री आणि बीडमधील नेते धनंजय मुंडे यांनी भगवानगडावर जाऊन भगवान बाबाचे दर्शन घेतले आणि भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्यासोबत राजकीय, सामाजिक परिस्थितीवर भाष्य केलं. त्यानंतर, धनंजय मुंडे हे खंडणी प्रकरणात गुन्हेगार नाहीत हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो, असेही त्यांनी म्हटले. मात्र, हे सांगत असतानाच आरोपींना आधी चापट मारली गेली आणि त्यानंतर हे घडले, त्यामुळे आरोपींच्या मानसिकतेचाही विचार करायला हवा, असे नामदेवश शास्त्री यांनी म्हटले. त्यावर बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, एक चापट मारली म्हणून त्याच्या बदल्यात १० चापटा त्यांनी मारल्या असत्या तरी चालले असते. मात्र,



केवळ एकाच चापटेच्या बदल्यात अशा प्रकारचा भीषण खून करण्यात आला.

संतोष देशमुखने ज्या आरोपीला चापट मारली, त्या चापट मारलेल्या आरोपीवर २२ गुन्हे आहेत. एक चापट मारली म्हणून त्यांनी एवढा भीषण खून केला. एका चापटेच्या बदल्यात त्यांनी आम्हाला १० चापट मारल्या असत्या तरी चाललं असतं, असे म्हणत नामदेव शास्त्री यांच्या वक्तव्यावर धनंजय देशमुख यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी, शास्त्री महाराजांच्या वक्तव्यावरुन त्यांनी संतापही व्यक्त केला आहे. एक चापट मारली म्हणून त्यांची मानसिकता काय झाली असेल असं तुम्ही म्हणता, मग आज आमची मानसिकता काय झाली असेल हे समाज बघतोय, सगळे लोकं बघतायत, त्याचंही उत्तर दिलं पाहिजे असे धनंजय देशमुख यांनी म्हटले. राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आरोपींना फाशी होणार असं म्हटलंय, आता आम्ही त्याचीच वाट बघतोय, तीच आमची मानसिकता आहे, असे धनंजय देशमुख यांनी म्हटल.


### जातीय संघर्ष नसून ही विकृती

एका चापटीच्या बदल्यात खून करायची मानसिकता तुमची असेल तर तुम्ही समाजाचं देणं लागत नाहीत हे स्पष्ट झालंय. पण, अशी जर मानसिकता कोणी केली तर दिवसा मुडदे पडतील, अशा शब्दात धनंजय देशमुख यांनी आपला संताप व्यक्त केला. दरम्यान, या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा जातीय संघर्ष नसून १८ पगड जातीचे लोक संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात न्याय मागण्यासाठी लढत आहेत. त्यामुळे, हा जातीय संघर्ष नसून ही विकृती असल्याचेही धनंजय देशमुख यांनी म्हटले.

## अजित पवारांच्या समोरच राडा! धस, मुंडे सर्वांसमोर भिडले

**प्रतिनिधी** । बीड

बीडच्या जिल्हा नियोजन विकास समितीची बैठक आज संपन्न झाली. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक पार पडली. अजित पवार बीडचे पालकमंत्री असल्यानं त्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक झाली. या बैठकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे, भाजप आ. सुरेश धस आणि माझ्यात बाचाबाची झाल्याचा दावा खा. बजरंग सोनावणेंनी केला आहे. तर या बैठकीत चांगली चर्चा झाल्याचं अन्य लोकप्रतिनिधींनी सांगितलं.जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकीत विकास निधी आणि नियोजन यासंदर्भात चर्चा होत



असते. आज झालेल्या बैठकीत चांगली चर्चा झाली. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सगळ्यांना त्यांचे विचार, संकल्पना मांडण्याची संधी मिळाली, असं मंत्री धनंजय मुंडेंनी सांगितलं. भाजपचे आ. सुरेश धस यांनी सरपंच हत्या प्रकरण, वाल्मिक कराड आणि तुमच्याविरोधात पुराव्यांचा पेन ड्राईव्ह अजित पवारांना दिला का, असा प्रश्न मुंडेंना विचारण्यात आला. त्यावर धस यांनी असा कोणता पेन ड्राईव्ह दिलेला नाही, असं उत्तर मुंडे यांनी दिलं. दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. संदीप क्षीरसागर यांनी बैठक व्यवस्थित झाल्याचं सांगितलं. अजितदादा अध्यक्षपदी असल्यानं बैठकीत शिस्त होती. मी त्यांच्या सोबत आधी काम केलेलं नाही. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीचा अनुभव मला आहे. त्यांनी आमच्याकडून विकासाचे मुद्दे समजून घेतले, असं क्षीरसागर यांनी सांगितलं.

## अंबाजोगाई-चनई मार्गावर दुचाकीच्या अपघातामध्ये तरुण ठार

**प्रतिनिधी** । बीड

दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दुसरा गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी रात्री अंबाजोगाई-चनई मार्गावर घडली. ऋषिकेश मधुकर भुरे (२५, रा. सनगाव, ता. अंबाजोगाई) असे मृत तरुणाचे नाव आहे. गेवराई तालुक्यातील बागपिंपळगाव बायपासवर धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर कंटेनरवर पाठीमागून टेम्पो आदळून चालक जखमी झाला आहे. पोलिसांनी कंटेनरसह चालकास पकडले आहे.

बायपासवर काही काळ वाहतूक ठप्प : टेम्पो-कंटेनर अपघातानंतर गेवराई तालुक्यातील बागपिंपळगाव बायपासवर काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. याची माहिती मिळताच गेवराई ठाण्याचे पोलिस रामनाथ उगलमुगले, अशोक हंबर्डे, महामार्ग विभागाचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कापुरे यांनी धाव घेऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत केली. अंबाजोगाई-चनई रस्त्यावरील भानुदासनगर येथे मंगळवारी रात्री साडेआठ वाजता दोन दुचाकींचा समोरासमोर अपघात घडला. अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव ऋषिकेश मधुकर भुरे (२५, रा. सनगाव, ता. अंबाजोगाई) आहे. दरम्यान, या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुसऱ्या व्यक्तीवर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात उपचार करण्यात येत असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद दाखल करण्याची प्रक्रिया बुधवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## अरेबियन ज्वेलर्सच्या ड्रॉमध्ये चार भाग्यवान विजेत्यांना बुलेट बाईक

**प्रतिनिधी** । बीड

बीड शहरातील प्रसिद्ध अरेबियन ज्वेलर्स यांनी दिनांक २८ जानेवारी रोजी चौथ्या ड्रॉचे आयोजन केले होते. या भव्य सोहळ्यात चार भाग्यवान विजेत्यांना बुलेट बाईक प्रदान करण्यात आली. हा शानदार कार्यक्रम हॉटेल गोल्डन चॉईस येथे संध्याकाळी ८ वाजता हजारो नागरिकांच्या उपस्थितीत पार पडला.ड्रॉसाठी मान्यवर ड. सनाउल्ला इनामदार, इमरान जागीरदार, पाले खान आणि आनंद वीर यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्यांची चिट्ठी काढण्यात आली. कार्यक्रमादरम्यान नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. विजेत्यांची नावे १. काशिफ अतिखर शेख,मोमिन इम्रान अब्दुल रौफ,शेख खानसा अजीम, अन्सारी जब्बार जफर आसे भाग्यवान विजेत्यांना तत्काळ बुलेट बाईक सुपूर्द करण्यात आल्या, ज्यामुळे उपस्थितांनी अरेबियन ज्वेलर्सवर प्रचंड विश्वास व्यक्त केला.

ग्राहकांचा विश्वास वाढवणारी बंपर ऑफर!-अरेबियन ज्वेलर्सने यापूर्वी देखील ग्राहकांसाठी भव्य बक्षीस योजना राबवल्या

### २ बीएचके फ्लॅट जिंकण्याची संधी; नाव नोंदणी सुरु



आहेत पहिल्या ड्रॉमध्ये - दोन क्रेटा कार,दुसऱ्या ड्रॉमध्ये - चार बुलेट बाईक,तिसऱ्या ड्रॉमध्ये चार बुलेट बाईक, आता पुन्हा चौथ्या ड्रॉमध्ये चार बुलेट देऊन ग्राहकांचा अरेबियन ज्वेलर्सवरील विश्वास अधिक दृढ होत चालला आहे.

### स्वप्नांचा २ बीएचके फ्लॅट जिंकण्याची संधी!

या सोहळ्यात अरेबियन ज्वेलर्सचे मालक महेबूब मल्लिक यांनी पुढील ड्रॉमध्ये भाग्यवान विजेत्याला थेट २ बीएचके फ्लॅट देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. नागरिकांनी तत्काळ नावनोंदणीसाठी गर्दी केली.लोकांचा मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता अरेबियन ज्वेलर्स भविष्यात आणखी मोठ्या योजना आणणार असल्याचे संकेत दिले आहेत.

### अफवांवर विश्वास ठेवू नका!

गेल्या काही दिवसांपासून अरेबियन ज्वेलर्सला बदनाम करण्याचे प्रयत्न काही लोकांकडून होत असल्याचे समोर आले आहे. मात्र, ग्राहकांचा मिळणारा जबरदस्त प्रतिसाद आणि वाढता विश्वास पाहता या अफवांना नागरिकांनी गांभीर्याने घेऊ नये, असे आवाहन अरेबियन ज्वेलर्सने केले आहे.



## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले तर राजीनामा - धनंजय मुंडे

**प्रतिनिधी** । बीड

मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर राजीनाम्यासाठी मोठा दबाव आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा मागितला तर मी तो देण्यास तयार आहे, असे मुंडे दिल्लीत बुधवारी म्हणाले.नैतिकतेच्या आधारावर मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची शक्यता फेटाळून लावताना ते म्हणाले, माझी नैतिकता माझ्या लोकांप्रती असलेल्या प्रामाणिकपणामध्ये आहे. मी पूर्ण प्रामाणिकपणाने बोलतो. मी स्वतःला नैतिकदृष्ट्या दोषी मानत नाही. जर मी दोषी असेन तर माझे वरिष्ठ नेते मला सांगतील.

मुंडे म्हणाले, जर मुख्यमंत्री किंवा अजित पवार यांना मी दोषी वाटत असेन तर त्यांनी माझा राजीनामा मागावा. मी दोषी असो वा नसो. राजीनामा देईन. गेल्या ५१ दिवसांपासून मला लक्ष्य केले जात आहे.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अजित पवार यांच्याकडे धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध कथित पुरावे सादर केल्याचा दावा केल्यानंतर मुंडे यांच्यावर राजीनाम्यासाठी दबाव वाढू लागला आहे. अजित पवार यांनी मुंडे यांची पाठराखण केली आहे.

## दहावी-बारावी परीक्षेसंदर्भात बोर्डाचा मोठा निर्णय!

### सरसकट केंद्र संचालक अन् पर्यवेक्षक आदलाबदलीचा निर्णय मागे

**प्रतिनिधी** । बीड

इयत्ता दहावी-बारावीची परीक्षा कॉपीमुक्त पार पडावी म्हणून पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची आदलाबदल करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांच्या १०० कलमी कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात आला होता.पण, शिक्षक संघटनांसह शिक्षक आमदारांच्या विरोधामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने तो निर्णय बदलला आहे. आता कोरोना काळ वगळून २०१८, २०१९, २०२० व २०२३ आणि २०२४ या काळातील परीक्षेवेळी ज्या केंद्रांवर गैरप्रकाराची प्रकरणे आढळली, त्या केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक मात्र बदलण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे.

सध्या इयत्ता बारावीच्या



### कॉपी आढळल्यास आता केंद्राची मान्यता कायमची रद्द

विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक तथा तोंडी परीक्षा सुरु आहे. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या काळात या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा होणार आहे. दुसरीकडे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी दरम्यान होणार असून त्यांची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात पार पडणार आहे. दरम्यान, राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक व लातूर आणि कोकण या विभागीय मंडळाअंतर्गत येणाऱ्या केंद्रांवर कोरोनाचे २०२१ व २०२२ हे दोन वर्षे वगळून २०१८ पासून झालेल्या परीक्षेत ज्या केंद्रांवर कॉपी प्रकरणे आढळली, त्या केंद्रांवर आता नवीन पर्यवेक्षक व केंद्र संचालक नेमले जाणार आहेत.

### बोर्डाच्या निर्णयानुसार आता कार्यवाही

परीक्षा केंद्रांसाठी सरमिसळ पद्धत यापूर्वीच अवलंबली असून आता केंद्र संचालक व पर्यवेक्षकांची आदलाबदल करण्याचे नियोजन आहे. त्यासंदर्भातील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्णय घेतला आहे. त्या निर्णयानुसार कार्यवाही होईल.

# गणेश जयंती निमित्त वरद विनायक मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

गणेश जयंती निमित्त्याने नवसाला पावणाऱ्या वरद विनायक गणेश मंदिर,देशपांडे गल्ली येथे महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ०१ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी सामुदायिक महा गणेशयाग,दुपारी महिलांचे भजन तसेच अथर्वशीर्ष पठण, सांयकाळी महाआरती महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाच्या आणि देशपांडे गल्लीतील नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# माजलगाव येथील फुलेनगर मधील स्वस्त धान्याची विक्री सुरळीत करा

## निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे बहुजन विकास मोर्च्याची मागणी

माजलगाव, सुनिल थोरात

माजलगाव येथील फुलेनगर भागामध्ये स्वस्त धान्याची अवैधरीत्या विक्री केली जाते ही विक्री थांबून राशन कार्ड धारकांना सुरळीत विक्री करा असे निवेदन माजलगाव तहसीलदार यांना देण्यात आले आहे. माजलगाव येथील फुलेनगर भागामध्ये एकूण तीन स्वस्त धान्याची दुकाने असून येथे सर्रास अवैधरित्या धान्य विक्री केली जात आहे सदरील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानावर सर्व राशन धारक यांची लोकसंख्या जास्त प्रमाणात असून सुरळीत धान्य पुरवठा होत नाही व येतील राशन दुकानदार मनमानी कारभार करत असल्याचे आढळून आल्याने सर्व राशन धारक हे आक्रमक झालेले आहेत एकाच नगर मध्ये तीन ते चार स्वस्त धान्य दुकाने असून सर्व दुकानांची एकसारखीच तक्रार आहे




तो ओळखीच्या नागरिकांना धान्य देणे महिलांना रांगेत तीन ते चार तास उभे करणे शासनाने गरीब जनतेसाठी मोफत असलेले राशन न देणे असा मनमानी कारभार स्वस्त धान्य दुकानदार करत आहेत सदरील परिसरात गरीब व गरजवंत लोकांची संख्या जास्त प्रमाणात असून त्यांना धान्य मिळत नाही त्यामध्ये स्वस्त धान्य दुकान नंबर एक हे सोळंके नामक व्यक्तीच्या मालकीचे असून त्यांनी ते दुकान दुसऱ्या चालवण्यासाठी दिल्याकारणाने सदरील व्यक्ती हा त्यांच्या ओळखीच्या नागरिकांना धान्य पुरवत आहे व स्थानिक रहिवासी महिलांसोबत गैरवर्तन करून आरेरावीची भाषा करून शिवीगाळ करत आहे. सदर राशन दुकान मालकाला फोन द्वारे वारंवार सांगितले असता सुद्धा तो त्यावर कोणताही तोडगा काढत नाही व ते दुकानात माझ्या मालकीचे राहिले नाही असे सांगत आहे. त्यानंतर फुलेनगर येथील यशोधरा बुद्ध विहाराच्या बाजूस असलेले बापटे यांचे मालकीचे दुसरे स्वस्त धान्य दुकान आहे या दुकानातून बाहेरच्या व्यक्तींना म्हणजेच विना राशनधारकांना धान्य वाटप करण्याचे काम अवैधरित्या चालू आहे. तसेच फुलेनगर येथील चाऊस यांच्या मालकीचे तिसरे स्वस्त धान्य दुकान आहे विना राशनधारकांना धान्य वाटप करण्याचे काम हे करत आहेत. सदरील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी व गरीब जनतेस न्याय द्यावा अशी मागणी या निवेदनाच्या माध्यमातून बहुजन विकास मोर्च्याचे

# गेवराई शहरात संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने भव्य सत्संग सोहळ्याचे आयोजन

## भजन, भारुड, कीर्तन, शिवमहापुराण कथा, मातृपूजन या सह विविध भक्तिमय कार्यक्रमांची रेलचेल

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : संस्कृती प्रतिष्ठान च्या वतिने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी सोमवार दि.३ फेब्रुवारी पासुन भव्य सत्संग किर्तन सोहळा महोत्सवास प्रारंभ होत असुन या सोहळ्यात महाराष्ट्रातील दिगज किर्तनकारांची किर्तन सेवेसाठी उपस्थिती लाभणार आहे. या किर्तन महोत्सवाचे हे १८ वे वर्ष आहे. सध्या या सत्संग किर्तन सोहळ्याची जोरदार तयारी चालु असुन प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले मोलाचे योगदान देत आहेत. तरी गेवराईकरांनी या सत्संग किर्तन सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्कृती प्रतिष्ठानच्या वतिने करण्यात आले आहे.

गेवराई येथे संस्कृती प्रतिष्ठान च्या वतीने गेल्या १७ वर्षापासून भव्य दिव्य अश्या सत्संग किर्तन सोहळ्याचे दरवर्षी नियोजनबध्द अयोजन केले जात आहे. यामध्ये शहरातील तसेच तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. तर या वर्षीच्या सत्संग किर्तन सोहळ्यास दि.३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. प्रतिमापूजन रामेश्वर महाराज राऊत, मनोहरभाऊ पिसाळ, शिवनाथ मस्के यांच्या हस्ते व कलश पुजन प्रभाकर पराड, संजय भालशंकर, चंद्रकांत राऊत यांच्या हस्ते होऊन सप्ताहाची सुरुवात होणार आहे. सत्संग कीर्तन सोहळ्यातील दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत. पूर्ण सप्ताह रोज दुपारी ०१ ते ०४ सुप्रसिद्ध कथाकार ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांच्या




अमृतवाणीतून शिवमहापुराण कथा असणारा असून, सोमवार दि.३ फेब्रुवारी रोजी सायं ०६ वा. प्रसिद्ध शहनाईवादक पं. कल्याणजी अपार (पुणे) यांचे शहनाई गुंजन कार्यक्रम. सायं. ८ वाजता. ह.भ.प. विलास महाराज गेजगे (बोथीकर, गंगाखेड) यांचे सुश्राव्य किर्तन. तर मंगळवार दि.४ फेब्रुवारी रोजी सायं ०६ वा. इंद्रजित आण्णा येवले यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम सायं. ८ वाजता. ह.भ.प. नारायण महाराज पालमकर (बाळकृष्ण महाराज संस्थान, गुरुपीठ) यांचे सुश्राव्य हरीकीर्तन तर बुधवार दि.५ फेब्रुवारी सायं ०६ वा. प्रसिद्ध भारुड सम्राट प्रभाकर महाराज कुटे यांचा भारुडाचा प्रबोधनपर कार्यक्रम सायं. ८ वाजता. ह.भ.प. कीर्तनरत्न प्रमोद महाराज जगताप (पुणे) यांचे सुश्राव्य हरीकीर्तन, गुरूवार दि.६ फेब्रुवारी रोजी सायं ०६ वा. संगित अलंकार सुरंजन जायभाये व कु. भक्ती जायभाये यांचा अभंगवाणी कार्यक्रम सायं. ८ वाजता. ह.भ.प. कीर्तनरत्न प्रशांत महाराज ताकोते (अकोला जि. बुलढाणा) यांचे सुश्राव्य हरीकीर्तन तर शुक्रवार दि.०७ फेब्रुवारी सायं ०६ वा. संगित अलंकार डॉ. तुळशीरामजी आतकरे गुरुजी यांचा अभंगनाद कार्यक्रम सायं. ८ वाजता. ह.भ.प. श्रीगुरू पुंडलिक महाराज देहुकर ( संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ) यांचे सुश्राव्य हरीकिर्तन, शनिवार दि.८ फेब्रुवारी सायं ५:३० ते ८:०० संत भगवानबाबा अध्यात्म सेवा गौरव पुरस्कार व तालुक्यातील विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान व्यक्तींच्या आईचा मानृपूजन सोहळा, सायं. ८ वाजता. ह.भ.प. कीर्तनरत्न संजय महाराज भोसले (वेळुकर,) सातारा यांचे सुश्राव्य हरीकीर्तन, रविवार दि.९ फेब्रुवारी सायं ०६ वा. संगीत अलंकार राधाकृष्णण गरड गुरूजी (श्रीक्षेत्र आळंदी देवाची) यांचा भजनसंध्या कार्यक्रम सायं. ८ वाजता. ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी श्रीक्षेत्र भगवानगड) यांचे सुश्राव्य हरीकीर्तन, सोमवार दि. १० फेब्रुवारी सकाळी ११ ते ०१ ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर (श्री क्षेत्र माऊली महाराज संस्थान चाकरवाडी) यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताहाचे अध्यक्ष संतोष भोसले, स्वागत अध्यक्ष परमेश्वर महाराज वाघमोडे, सचिन ढाकणे, प्रमुख मार्गदर्शक अक्रूर महाराज साखरे, उत्तम नाना मोटे, मधुकर तौर, समन्वयक माधव चाटे यांच्यासह संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# गजानन विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा

**नवगण राजुरी (प्रतिनिधी)**

**येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य केशव भांगे हे होते. गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी स्वयंशासन दिन साजरा केला.** या स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका भक्ती दहिवाले, उपमुख्याध्यापिका क्रांती सुपेकर, पर्यवेक्षक संकेत दराडे यांनी एक दिवसीय शाळेचे उत्कृष्णपणे काम केले. याप्रसंगी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य केशव भांगे यांनी स्वयंशासन दिनाचे महत्व सांगून अनेक विद्यार्थी चांगले घडत असतात, ते अशाच कार्यक्रमातून पुढे येऊन भविष्यात मोठे होतात असे ते म्हणाले. यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले बी.एस., सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तकर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.सरिता झांजुर्णे, आरती मोराळे यांनी केले तर शेवटी सृष्टी काळे हिने उपस्थितांचे आभार मानले.

# पत्रकार प्रशांत बर्दापूरकर कै.साधु गुरुजी पुरस्काराने सन्मानित




अंबाजोगाई (प्रतिनिधी)


येथील जेष्ठ पत्रकार प्रशांत बर्दापूरकर यांना जयभारती सेवाभावी प्रतिष्ठान व जाधव कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने कै.साधु गुरूजी स्मृती पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नंदकिशोर मुंदडा,ऍड. महाजेर अली उस्मानी, ऍड.संतोष पवार,डॉ. राकेश जाधव,रामकृष्ण पवार,ऍड.अविनाश धायगुडे,ऍड.माधव जाधव,दि.ना.फड आदी उपस्थित होते.गेल्या अनेक वर्षापासुन पत्रकारितेत कार्यरत असलेल्या दै.सकाळचे प्रतिनिधी प्रशांत बर्दापूरकर यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहे आपल्या लेखनातून त्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले त्यांच्या उत्कृष्ट आणि सामान्यांना न्याय देणाऱ्या वृत्ताची दखल घेऊन कै.साधु गुरूजी पुरस्काराने गौरविण्यात आले. प्राप्त झालेल्या पुरस्काराबद्दल प्रशांत बर्दापूरकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गौखेल फाटा ते सावरगाव रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू

## खड्डे बुजवल्यामुळे वाहन धारकाचा त्रास कमी

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील प्रसिद्ध असणारे श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान या देवस्थानाला जाणारा रस्ता व त्यावरील खड्डे हे सध्या बुजवण्याचे काम चालू आहे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड या गडावर महाराष्ट्रातील मुंबई पनवेल सह विविध राज्यातील भाविक दर्शनासाठी येत असतात त्यामुळे या खड्डेमय रस्त्याचा त्रास त्यांना सहन करावा लागत होता परंतु आता या रस्त्यावरील खड्डे बुजूवने चे काम जोरात चालू आहे उत्कृष्टपणे रस्त्यावरील खड्डे



बुजवले जातात त्यामुळे आता येणाऱ्या भाविकांना या रस्त्यावरून प्रवास करताना आपला प्रवास सुखकर करता येईल यासाठी संबंधित ठेकेदाराने काळजी घेत या रस्त्यावरील खड्डे व्यवस्थित बुजवले पाहिजे त्यासाठी प्रयत्न करत आहेत कारण हे देवस्थान प्रसिद्ध असल्याने या रस्त्यावरून सारखे वाहनांची रेलचेलच एकूण नऊ किलोमीटरचे हे रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम चालू आहे पूर्वी खड्ड्यात रस्ता के रस्त्यात खड्डे हेच लोकांना कळत नव्हते त्यामुळे वाहन धारकांना फार त्रास सहन करू लागत होता परंतु आता या रस्त्यावरील खड्डे बुजलेली लोकांना आपला प्रवास सुखकर होत आहे चालू असते त्यामुळे वाहनधारकांना रस्त्यावरून सुखकर प्रवास करता येईल यासाठी या रस्त्याचे काम योग्यरीत्या करण्यात येत आहे

# आष्टी तालुक्यात ५०० खाटांचे कॅन्सर रुग्णालय उभारणार

## मा. आ. भीमराव धोंडे यांची घोषणा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी - पाटोदा - शिरूर तालुक्यातील गोरगरीब जनतेच्या आरोग्य सेवेसाठी आष्टी तालुक्यात लवकरच ५०० खाटांचे अद्ययावत कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येईल, अशी घोषणा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर तालुक्याचे मा. आ. भीमराव धोंडे यांनी केले. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर तालुक्याचे मा. आमदार भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित गंगाई - बाबाजी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

मा. मंत्री प्रा. सुरेश नवले, मा. आ. राजेंद्र जगताप, मा. आ. जनार्दन भाई तुपे, ह. भ. प. दिनकर महाराज तांदळे, ज्येष्ठ प्राचार्य अनंत हंबर्डे, डॉ. अजय दादा धोंडे, बापूसाहेब भंडारी, कबड्डीचे राष्ट्रीय खेळाडू श्रीमंत उबाळे, राजू काका धोंडे, अशोक साळवे, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी बोलताना मा. आ. भीमराव धोंडे म्हणाले की, बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर तंबाखू, विडी, सिगारेट अशी व्यसने कामाचा क्षिण घालविण्यासाठी केली जातात. त्यामुळे अनेक नागरिक वयाच्या साठीनंतर कर्करोगाने ग्रस्त होतात. कर्करोगाचे निदान लवकर न झाल्यास व त्यांना चांगले उपचार न मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर रुग्ण दगावतात. हा धोका लक्षात घेऊन बीड जिल्ह्यातील रुग्णांसाठी सवलतीच्या दरात कर्करोग निदान व उपचार करणारे रुग्णालय सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे आपण आष्टी तालुक्यात लवकरच अद्ययावत कर्करोग निदान व उपचार रुग्णालयाची उभारणी करणार आहोत. त्यासाठी आमचे सर्व स्तरावरून प्रयत्न सुरू आहेत. त्याचा फायदा नगर आणि बीड जिल्ह्यातील रुग्णांना नक्की होईल.

आपल्या आई-वडिलांची आठवण दरवर्षी यावी म्हणून, त्याच बरोबर शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे. कला, साहित्य, संस्कृतीचे संवर्धन व्हावे. यासाठी गंगाई - बाबाजी महोत्सव सुरू केला आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून आत्तापर्यंत अनेक कलावंत, लेखक, साहित्यिक, खेळाडू घडले आहेत. दरवर्षी आपण समाजातील विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या गुणवंतांचा विविध पुरस्कार देऊन सत्कार करतो.

विद्यार्थ्यांनो कुठलीही व्यसने करू नका, भरपूर अभ्यास करा, व्यायाम करा शरीरयष्टी कमवा. केवळ पोलीस भरती आणि मिलिटरी भरतीसाठी सराव करू नका, तर विविध स्पर्धेत भाग घ्या. त्या माध्यमातून तुम्हाला मोठे अधिकारी होता येईल आणि आपले जीवन समृद्ध करता येईल असे ते म्हणाले.प्रा. सुरेश नवले म्हणाले कि,नव्या पिढीच्या मनात चांगले विचार रुजविण्यासाठी तसेच बिघडलेली सामाजिक स्थिती बदलण्यासाठी गंगाई बाबाजी सारख्या महोत्सवांची गरज आहे. मायबापांना देवाचे स्वरूप देणारे मा. आ. भीमराव धोंडे हे आदर्श समाज निर्माण व्हावा म्हणून गंगाई - बाबाजी महोत्सवाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्र ही पुण्य भूमी आहे, वज्र भूमी आहे. महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी हजारो वारकरी आणि मावळे दरवर्षी घराबाहेर पडतात. त्यामुळेच या राज्यात महाराष्ट्र धर्म टिकून आहे. या महाराष्ट्रात ठीक ठिकाणी वेगवेगळे महोत्सव साजरे होतात परंतु आपल्या आई-वडिलांच्या नावाने होणारा आष्टीतील हा एकमेव महोत्सव आहे. गंगाई - बाबाजी महोत्सव हा साहित्यिक व सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे यु-टुब च्या माध्यमातून जतन करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

यावेळी मा. आ. राजेंद्र जगताप यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मा. आ. जनार्दन तुपे, मा. आ. राजेंद्र जगताप, प्राचार्य अनंत हंबर्डे यांचीही भाषणे झाली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून या महोत्सवाचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. बाळासाहेब गावडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सूर्यकांत धोंडे यांनी वार्षिक क्रीडा अहवाल सादर केला. प्रा. श्रीकांत धोंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपप्राचार्य प्रा. डॉ. ज्ञानदेव वैद्य, उपप्राचार्य प्रा. डॉ. अप्पासाहेब टाळके

# तलाठी हजारे व मंडळ अधिकारी बांगर हे दोघे मिळून करतात शेतकऱ्यांची पिळवणूक

## कार्यालयी हजर न राहता छुप्या पद्धतीने दलाला मार्फत हॉटेलमधून चालतो कारभार

माजलगाव, सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी सज्जावर असणारे तलाठी हजारे व मंडळ अधिकारी बांगर हे दोघे मिळून शेतकऱ्यांची पिळवणूक करतात यांच्याकडे रोज कितीतरी शेतकऱ्यांचे कामे पडत असतात यांना कॉल केल्यानंतर हे कॉल स्वीकारत नाहीत कार्यालयावर तर कधीच हजर नसतात आणि गावाकडे तर फिरकत सुद्धा नाहीत . जिल्हाधिकारी साहेब तलाठी हजारे व मंडळ अधिकारी बांगर यांना शोधून देता का ? असा सवाल शेतकऱ्यांनी केलेला आहे.

हे दोघे कुठे गायब असतात हे अजून कोणालाच माहिती नाही जर कधीतरी एखाद्या शेतकऱ्याची भेट झालीच आणि कामाविषयी काही विचारले तर हे मुजोरपणा दाखवतात व अरेरावीची भाषा करतात यांनी काही दलाल पाळलेले आहेत या दलाला मार्फत आर्थिक तडजोडीची कामे केली जातात असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तलाठी हजारे व मंडळ अधिकारी बांगर कधीच कार्यालयी उपस्थित नसतात यांचा कारभार हा बायपास रोड वरील एका हॉटेल मधून चालतो तो पण गुप्त पद्धतीने कधीतरी मनाला आले तर हे हॉटेलवर येतात व तिथून कारभार करतात.लाखो रूपये खर्च करून गावांमध्ये तलाठी कार्यालय बांधलेले आहेत.पण सध्या ते धूळ खात पडले आहेत.तलाठी हे कधीच या कार्यालयात येत नाहीत. शेतकरी यांना शेतातील कम धंदा सोडून माजलगाव या ठिकाणी यावे लागते पण तलाठी भेटत नाही किंवा फोन ऊचलत नाही आणि उचलला तरी मी बाहेर आहे आजारी असे अनेक कारणे सांगतात यामुळे या त्रासाला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. वारंवार तक्रार करूनही याची दखल घेतली जात नाही. यांच्या या सर्व प्रकाराला शेतकरी हे फार वैतागलेले आहेत व कंटाळलेले आहेत शेतकऱ्यांनी आता यांच्या विरोधात आवाज उठवायला चालू केले आहे.१० फेब्रुवारी पर्यंत तलाठी हजारे व मंडळ अधिकारी बांगर यांची तात्काळ बदली नाही केली तर येणाऱ्या आठ दिवसात उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सर्व शेतकऱ्यांनी दिलेला आहे. अशा आशयाचे निवेदन हे उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी यांना देणार असल्याची माहिती यावेळी शेतकऱ्यांनी दिलेली आहे. संबंधित प्रकरणांची चौकशी करून तलाठी व मंडळाधिकारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केलेली आहे.

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँ अंबाजोगाई तालुका कार्याध्यक्ष पदी यशोदीप किर्दत यांची नियुक्ती



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सामाजिक कार्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटात सक्रिय असलेले यशोदीप किर्दत यांच्यावर पक्षाकडून नवीन जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांची राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या अंबाजोगाई तालुका कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मान्यतेने यशोदीप किर्दत यांची राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार अंबाजोगाई तालुका कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र राजेसाहेब (भाऊ)देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी राजेसाहेब (भाऊ) देशमुख, ऋषिकेश गडदे विद्यार्थी प्रदेश सचिव आदींची उपस्थिती होती.

## लोकनेते ना.धनंजयजी मुंडे साहेब यांनी घेतला श्री क्षेत्र भगवानगडाचा आशीर्वाद



**भगवानगड : पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र भगवानगड येथे महाराष्ट्र राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री माननीय धनंजय मुंडे यांनी गुरुवार दिनांक ३० रोजी श्रीक्षेत्र भगवानगड येथे रात्री ८:३० वाजता आगमन झाले त्यांनी त्यांच्या नियोजित दौऱ्यामध्ये भगवान गडावरती रात्रीचा मुक्काम भगवानगडावरतीच करणार अशी दौऱ्यामध्ये सांगितले गडावरती आगमन झाल्यानंतर प्रथम त्यांनी श्री संत भगवान बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले त्यानंतर ते न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या दर्शनासाठी गेले**

त्यानंतर डॉ.नामदेव महाराज शास्त्री सोबत त्यांनी भोजन केले त्यानंतर श्री संत ज्ञानेश्वर माऊलीच्या सुरू असलेल्या मंदिराच्या कामाविषयी शास्त्री जी व मुंडे यांच्यामध्ये चर्चा झाली सकाळी ते दहा वाजेपर्यंत भगवानगडावरतीच असणार आहेत सकाळी ते ज्ञानेश्वर माऊलीच्या सुरू असलेल्या मंदिर बांधकामाचे देखील पाहणी करणार आहेत त्यानंतर ते १० वाजल्याचे पुढे भगवानगडावरून मोटारीने परळी वैजीनाथ जि. बीड कडे प्रयाण करणार आहेत.

# सामाजिक समरसतेतले सर्वश्रुत व्यक्तीमत्व

दत्तात्रय नलावडे ( देवा ).

माणसाने कुठे ? कधी आणि कोणाच्या पोटी जन्म घ्यावा हे माणसाच्या हाती नसते मात्र जीथे आपण जन्म घेतला,त्या जातीचा.... त्याया धर्माचा....त्या माता-पित्याचा. त्या मातीचा,उध्दार करणे आपल्या हाती असते म्हणून कृतार्थ भावनेने आपण आपली कर्तव्यपुर्ती केलीच पाहिजे कारण भगवान श्रीकृष्ण श्रीमद्भगवद्गीतेत म्हणतात कर्तव्याला पर्याय नाही .सत्कार्य करणारी माणसं मोठ्या मनाने विचार करत असतात कि समाजाने मला काय दिले यापेक्षा मी समाजाला काय दिले हे महत्त्वाचे आहे आणि या सर्व उदात्त विचारांची शिदोरी घेऊन सामाजिक ,धार्मिक, अध्यात्मिक ,राजकीय , सांस्कृतिक , क्षेत्रामध्ये तन मन धन अर्पित करून काम करणारे श्री दत्तात्रय तुकाराम नलावडे ज्यांना सर्वजण मोठ्या आदराने देवा या नावाने संबोधतात.पेठ बीडमधील करिमपुरा गल्लीत लोकांची मळलेली कपडे धुवून आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या परिट समाजाच्या नलावडे परिवारात स्वा.सै. तुकारामजी नलावडे आणि आसराबाई नलावडेंच्या पोटी जन्म झाला.....वडील तुकारामजी नलावडे हे मराठवाडा मुक्ती संग्रामात सक्रिय असल्यामुळे घरी अनेक महनीय स्वातंत्र्यसैनिकांचे येणे जाणे होते.त्यामुळे दत्तात्रय नलावडे यांच्यावर देव , देश आणि धर्म या विचारांचा प्रभाव झाला आणि स्वातंत्र्या

शिवाय अर्थ नाही या विचारांचे बाळकडू लहानपणीच देवांना मिळाले....आणि दत्तात्रय नलावडे आता जीथे श्री. बालाजी मंदिर मंगल कार्यालय आहे तीथे भरत आसलेल्या संघ शाखेमध्ये नित्यनेमाने सहभागी होऊन मातृभूमिच्या.... प्रेमाने शिगोशिग भरलेली नमस्ते सदा वत्सले मातृभूमे त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम् । महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।। हि प्रार्थना अंतःकरणात रुजवु लागले...संघ शाखेमध्ये प्रत्येक दिवशी नित्यनियमाने जात असल्या मुळे मित्रत्वासह सांघीक भावना विकसित होत गेली , सर्व मैदानी खेळांमध्ये सर्वात पुढे राहिले . त्यामुळे देवांचे शरीर सुडोल झाले.म्हणून आज ही वयाच्या एक्काहत्तरा व्या वर्षी नवतरुणाला लाजवेल असा उत्साह सकारात्मक विचारांची दृष्टी , सामाजिक ऐक्याची भावना दत्तात्रय नलावडेमध्ये दिसते.बालपणीच मित्रांची संख्या वाढत असल्यामुळे दत्तात्रय नलावडेचे बाल जीवन हे नानाविध मित्रांच्या संपर्कात आल्यामुळे दत्तात्रय नलावडेंचे व्यक्ति मत्व अष्टपैलू होत गेले..... ज्याप्रमाणे देवा ला कोण तीच गोष्ट वर्ज्य नसते त्याप्रमाणे दत्तात्रय नरवडे यांना कोणतीच गोष्ट वर्ज्य राहिली नाही.... परिणामी मित्र परि वार आदराने दत्तात्रय नलावडेंना देवा म्हणू लागला .संघ शाखेच्या राष्ट्रीय विचारांमुळे देवांच्या विचारांना समाजसेवेची धार आल्याने देवा सामाजिक , धार्मिक , अध्यात्मिक , सांस्कृतिक क्षेत्रातील कामात सहभागी होऊन राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामील झाले. नुकतच भारतमातेला स्वातंत्र्य मिळाल्याने समाजामध्ये अनेक समस्या निर्माण होत्या त्या समस्यांचा सामाजिक स्तरावर मार्ग काढण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणपती उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व होते. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणपती उत्सवाच्या प्रगल्भ विचारातून सुरू झालेल्या नवरंग गणेश मंडळाचे देवा एक रंग झाले....सक्रिय सदस्य झाले....पुढे हेच श्री नवरंग गणेश मंडळ ऐतिहासिक महत्त्व आसलेल्या चंपावतीनगरीच्या सांस्कृतिक तेने मांळलेले इंद्रधनुष्य झाले.लोकमान्य टिळक यांनी ज्या उद्देशाने गणेशोत्सवाला सुरुवात केली होती तो उद्देश फलद्रुप करण्यासाठी नवरंग गणेश मंडळाने जेवढे म्हणून परिश्रम घेतले...त्या परिश्रमात



देवांचे परिश्रम हे अधोरेखित करण्यासारखे आहे.त्यातुनच येणाऱ्या भावी पिढीला प्रोत्साहन मिळाले....मिळते आहे.....देवांच्या मार्गदर्शनात नवरंग मंडळाच्या माध्यमातून समाजाला ज्या सेवाभावी व्यक्ती मिळाल्या त्यांचा उल्लेख नावा शिवाय करणे योग्य नव्हे पण आकाशातल्या चांदण्यांचे ......उद्यांनातील नवरंगी सुगंधी फुलांचे सौंदर्य अधोरेखि त करता येते का ? तसेच येथे श्री नवरंग गणेश मंडळां च्या नवरंगी कार्यकर्त्यांच्या नावांचे..... तेच श्री नवरंग गणेश मंडळ देखावा करण्यात आज हि बीड जिल्ह्यात सर्वत पुढे आहे.किल्लारी येथे भूकंप झाला होता तेव्हा कोसळुन पडलेल्या अनेक परिवारांना दिलासा देण्यासाठी.देवांनी नवरंगच्या देवा सारखा कार्यकर्त्यांना घेऊन केलेले काम संत गाडगे महाराजाच्या विचारांची पुजा आहे.....समाजसेवेची आवड असणाऱ्या देवांना राजकारणाची ओढ लागली आणि साहजिकच देवा भारतीय जनता पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते झाले पुढे त्यांना बीड नगरपालिकेच्या नगरसेवक उमेदवारीचे तिकीट ही मिळालं पण राजकारणामध्ये निवडून येण्यासाठी आव श्यक असणारा पैसा आणि जातिवाद करण्याची वृत्ती त्यांच्याकडे नव्हती. त्यामुळे त्यांचा पराजय झाला पण यातून भारतीय जनता पक्षाला एक निष्कलंक कार्यकर्ता भेटल्याचे चर्चा मात्र झाली. त्याचे असे झाले की निवडणूक लढवण्यासाठी पक्षातर्फे त्यांच्याकडे जो आर्थिक निधी आला होता पैकी उरलेला निधी त्यांनी पक्षाकडे परत सुपुर्द केला. त्यामुळे निवडून आलेल्या उमेदवारा पेक्षा पराजित झालेल्या दत्तात्रय नलवडेच्या प्रामाणिकपणाची चर्चा मात्र जास्त झाली आणि ही गोष्ट भारताची भूतपूर्व प्रधानमंत्री स्वर्गीय अटल बिहारी बाजपेयी बीड येथे आले असता त्यांच्या कानावर गेली. तेव्हा देवा सारखा प्रामाणिक कोण हे पहाण्यासाठी स्व.श्री.अटल बिहारी वाजपाईजींनी त्यांच्या प्रामाणिकतेचे कौतुक केले.गेली अनेक दशकांपासून श्री मुक्ताईनगर ते श्रीक्षेत्र पंढरपूरपर्यंत संत श्री मुक्ताबाईची पालखी बीड येथे भक्तां ना दर्शन देण्यासाठी मुक्कामी असते . पुढच्या मुक्कामी आदिशक्ती संत श्री मुक्ताबाई पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांची सोय होत नाही म्हणून देवांनी श्री.बालाजी मंदिर मंगल कार्यालय येथे जास्तीचा मुक्काम मागुन घेतला आणि अध्यात्मिकतेची आवड असणाऱ्या नागरिकांच्या सहकार्याने आदिशक्ती संत श्री मुक्ताबाई सोहळ्यातील वारकऱ्यांची व्हराडी मंडळी सारखी आग्रहपूर्वक चोख व्यवस्था केली जाते. तसेच पंढरपूर स्थीत श्री पांडुरंगाच्या पादुकांचे बीड शहरात आगमन होते तेव्हासुध्दा वारकऱ्यांची सेवा अतिशय श्रद्धापूर्वक मित्रपरिवाराच्या सहकार्य करण्यामध्ये देवांचा सिंहाचा वाटा असतो.आई-वडील परंपरेने लोकांचे कपडे धुण्याचा काबाडकष्टी व्यवसाय करत असल्यामुळे आणि परस्थीती अतिशय प्रतिकूल असल्यामुळे देवांनी शिक्षणास राम राम केला. पण त्यांच्या सामाजिक कामाकडे पाहिल्यानंतर स्व. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे व्यासंगापेक्षा जीवनाची समज महत्त्वाची असते हे वाक्य आठवते आणि याच वाक्याप्रमाणे देवांच्या जगण्याचा प्रत्यय येतो. देवांच्या सामाजिक, धार्मिक ,अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कामाची फलद्रुप होत होते म्हणून देवांनी गणेश आणि श्रीकांत यांच्यात आदर्श गुणांची बिज रोवली म्हणून देवांच्या पावलावर पाऊल टाकून वडिलांच्या विचारांची समाजसेवेची पताका घेऊन जीवन जगत आहे.या बाबत घटनाचा उल्लेख महत्वाचा आहे. अनेक ग्राहकांचे कपडे धुण्यासाठी किंवा इस्त्री साठी येतात तेव्हा अनेकदा कपड्यांच्या खिशांमध्ये हजारो रुपयांमध्ये रोकड सोन्याचे दागिने आले आहेत आणि ते श्रीकांत व गणेश यांनी अतिशय प्रामाणिक

पणाने संबंधित ग्राहकास परत केल्याच्या बातम्या सर्वश्रुत आहे.तेव्हा जन्म दिलेली मुलंच जेव्हा आपल्या विचारांचे संवर्धन आणि संक्रमण करतात तेव्हा प्रत्येक बाप म्हणत असतो आणखी काय हवं ? म्हणून देवा संततीच्या बाबतीत सुखी समाधानी आहेत.अशा या व्यासंगापेक्षा जीवन जगण्याची आणि जगण्याची समज अधिक असलेल्या दत्तात्रय तुकारामजी नलावडे उर्फ देवा भाऊंचा एक्काहत्तरावा वाढदिवस समारंभ श्री गणेश जयंतीचे औचित्य साधुन संपन्न होत आहे.तेव्हा चंपावतीनगरीच्या महानुभवांच्या मनःपूर्वक शुभेच्छा

सुख-समृद्धी , वैभव-आरोग्य सदैव आपुल्या

खांद्यावर मिरवत रहावे हिच एक नवरंगी इच्छा.

मनातील इच्छापुर्तीसाठी श्री नवरंग इच्छापूर्ती गणपती

पाठीशी उभा रहावा सदैव याच शुभेच्छा.

**-निवेदक सुरेश साळुंके.**
व्यक्ती परिचय लेख लेखक.
७०२०५५५०६५

# आ.संदीप क्षीरसागरांकडून डीपीडीसी बैठकीत केले महत्वाचे लोकप्रश्न उपस्थित

## मतदारसंघातील विविध कामांसाठी केली विशेष अतिरिक्त निधीची मागणी

बीड (प्रतिनिधी)

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी (दि.३०) रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील लोकांच्या आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले लोकप्रश्न मांडले. तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी विशेष अतिरिक्त निधीची मागणीही आ.क्षीरसागर यांनी यावेळी केली.गुरुवारी (दि.३०) रोजी बीड जिल्हा नियोजन समितीची, पहिली बैठक महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघाच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न मांडले.

आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या मागण्या

- बीडच्या पंचायत समिती आवारामध्ये स्व.आण्णासाहेब पाटील व स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांचा पुतळा बसविणे.

- ३० खाटाचे आयुष रूग्णालय छठक्कअंतर्गत २०१९ ला बीडसाठी मंजुर आहे. त्यासाठी शासकीय जमीन बीड शहरातील इमामपुर रोडवरील गट नं.३४-३५ व पारगाव जप्ती या शिवारात उपलब्ध आहे.यासाठी कार्यवाही व्हावी.

- नगर परिषदेकडे महावितरणची ३६ कोटी जास्त रूपयांची थकबाकी आहे. त्या संदर्भात जनहित याचिका देखील दाखल आहे. नगरपरिषदेच्या सोलार प्रकल्पाची विद्युत निर्मिती होते ती विद्युत विभागाला द्यायची आणि त्यांच्याकडून आपणास हवा असणारा विद्युत पुरवठा घ्यायचा. तसेच ३६ कोटी रुपये थकबाकी भरण्यास मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी तत्वतः मंजूरी दिली आहे. त्याबाबत मा.दादांचे आभार व्यक्त केले.

- बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतःळ्याची उंची वाढवणे याबाबतीत तात्काळ पुढील कार्यवाही बाबत संबंधितास आदेशीत व्हावे.

- अल्पसंख्यांक मुलींच्या वस्तीगृह मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून बीड शहरात उपलब्ध असलेल्या शासकीय आवारामध्ये सहन जागा उपलब्ध करून देणे.

- जिल्हा नियोजन अंतर्गत बीड नगर परिषदेला नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत १० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध व्हावा.

- बीड नगर परिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं.७४५४ मधील जुने तहसील कार्यालय जागेत दुकान केंद्रासाठी व उर्दु घरासाठी बीड नगर परिषदेकडे हस्तांतरण व तसेच सुभाष रोड येथील जनावरांचा दवाखानाची जागा नगर परिषद, बीडला हस्तांतरण करणेसाठी बैठकीचे आयोजन बाबत संबंधितास आदेश व्हावे असे झाल्या नगर परिषद, बीडच्या स्वउत्पन्नामध्ये वाढ होईल.

- बीड येथील जनावरांचा दवाखाना, सुभाष रोड येथील जागा नगर परिषद, बीड ला हस्तांतरण करणेसाठी बैठकीचे आयोजन करणे.

- बीड नगर परिषद हद्दीतील जुने तहसील कार्यालय जागेत दुकान केंद्रासाठी व उर्दू घरासाठी बीड नगर परिषदेकडे हस्तांतरण करणेबाबत

- सन २०२० चा रखडलेला पीक विमा राज्य तक्रार समितीने डिसेंबर २०२२ मध्ये बीड,वडवणी,गेवराई तालुक्यातील शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्याचे सांगितले होते. मात्र एक वर्ष उलटले तरी अद्याप तरी अंमलबजावणी झाली नाही.

- महाडीबीटी अंतर्गत लाभार्थी असलेल्या विविध योजनेतील लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नाही. या बाबत विभागाकडून निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे.

- श्री क्षेत्र कपिलधार १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजुर असून त्यास मान्यता देण्यात यावी.

- शिवणी ता.बीड येथील महाविहार धम्मभुमी बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण केंद्रास 'क' दर्जा तीर्थक्षेत्र दर्जा देण्यात यावा.

- श्री क्षेत्र उजव्या सोंडीचा गणपती मंदिर देवस्थान मन्यारवाडी, श्री क्षेत्र बेलखंडेश्वर महादेव संस्थान बेलखंडी पाटोदा ता.जि.बीड या तिर्थक्षेत्रास 'क' दर्जा प्राप्त करण्यात यावा.

- खंडेश्वरी मंदिरासमोरील तालुका क्रीडा संकुलासाठी आपल्या विभागाकडून ५ कोटी रूपयांच्या विविध क्रीडा सुविधा निर्मितीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी १ कोटी रूपयांच्या निधी प्राप्त असून उर्वरित ४ कोटी रूपयांच्या विकास कामांचा आराखडा सादर केलेला असून त्या निधी उपलब्ध होणे बाबत.

- बीड जिल्हा संकुलाची निर्मिती व सर्व क्रीडा सुविधांचे काम २५ वर्षापुर्वी झालेले आहे. सदर क्रीडा संकुलासाठी ८ कोटी रूपयांची तरतुद झालेली आहे. संकुलाची इमारत दुरूस्तीचे व क्रीडा सुविधांच्या दुरूस्तीचे काम करणे गरजेचे असून नवीन क्रीडा संकुलाच्या निर्मितीप्रमाणे संकुल व क्रीडा सुविधांच्या दुरूस्तीसाठी विशेष बाब अंतर्गत १७ कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावी.

- बोरफडी, मौज, जेबापिंप्री दगडी शहाजानपुर, मन्यारवाडी, मांजरसुंबा ता.बीड येथील उपकेंद्र इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा.



- बीड शहरातील अंकुशनगर उपकेंद्रावरून अर्ध्यापेक्षा जास्त बीड शहराला वीज पुरवठा आहे. सर्व सरकारी कार्यालय व वाढीव वस्त्या सदर उपकेंद्रावर असून ओव्हरलोड होत असून नवीन अतिरिक्त उपकेंद्र पोलीस कॉलनी येथे झाल्यास सोयीस्कर होईल व लाईटची अडचण मार्गी लागेल.

- बीड जिल्हा वसुलीमध्ये एक नंबर असून शहरातील दुरुस्तीच्या कामांना निधी उपलब्ध व्हावा.

- डीपीडीसीमध्ये बीड तालुक्यातील एकही प्रस्ताव मंजुर झालेला नाही.

- ऋगावठाण अंतर्गत वस्ती येथील डी.पी.देणे बाबत नियम व अटी शिथील करण्यात यावे.

- बीड शहर अंतर्गत जुने पोल बदलणे व केबलद्वारे काम करणेसाठी आदेशीत व्हावे.

- पाली येथील ३३ के.व्ही.चे काम सुरू करणे बाबत आदेशीत व्हावे.

- निवारणबीड व शिरूर का.तालुक्यातील कृषी व सिंगल फेज डी.पी.देण्यात यावे.

- ताडसोन्ना, लिंबारुई, चर्हाटा, आहेरधानोर, बोरखेड, मोरगाव ता.बीड येथे वीजवितरण उपकेंद्र करण्यासाठी मंजुरीसह देण्यात यावा.

- बीड व शिरूर कासार तालुक्यात शाळा खोली बांधकाम, दुरूस्ती आणि कंपाऊंड वॉल बांधकाम करणे.

- बीड १ व २ ,बीड नागरी,शिरूर कासार येथील प्रकल्पातील व प्रकल्पांतर्गत अंगणवाडीतील रिक्तपदे भरणे.

- युवा शांतीवन पाली येथील उर्वरित कामे करणेसाठी निधी उपलब्ध करण्यात यावा.

- देवराई येथील आराखडा तयार करून कामे करणेसाठी निधी उपलब्ध होणे बाबत.

- शिरूर तालुक्यातील हिवरसिंगा, जवळागिरी, बरगवाडी या गावातील वाहतुकीसाठी रेल्वे ब्रिज नसल्यामुळे गावात नागरिकांना ये-जा करण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. याबाबत रेल्वे विभागाकडे प्रस्ताव सादर करून या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी विनंती केली.



## भाजपाच्याभाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे कामाला लागावे जिल्ह्याच्या विकासासाठी खंबीरपणे मी आपल्या पाठीशी आहे -पंकजाताई मुंडे

### नामदार पंकजाताई मुंडे यांची भाजपाच्यां जिल्हा कार्यालयास भेट

बीड (प्रतिनिधी)

भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी सक्रियपणे कामाला लागावे माझ्या चांगल्या आणि वाईट काळात बरोबर राहिलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या मी खंबीरपणे पाठीमागे उभी राहणार आहे असे विचार महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्हा कार्यालयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड येथील जिल्हा कार्यालयावर आज नामदार पंकजाताई मुंडे यांच्या सत्काराचा व संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी केज विधानसभेच्या आमदार नमिताताई मुंदडा ,जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख भाजप नेते अक्षय मुंदडा जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, आदित्य सारडा ,देविदास नागरगोजे ,नवनाथ शिराळे , विक्रांत हजारी,सलीम जहांगीर, अशोक लोढा , भारत काळे ,अजय सवयी , शांतिनाथ डोरले , गेवराईचे तालुकाध्यक्ष प्रकाश काका सोळुंके , माजलगाव तालुक्याचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत,केज तालुका अध्यक्ष भगवान केदार ,धिरूरचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब चोले , संगीता धसे ,मीराताई गांधले ,उषाताई मुंडे ,आदी प्रमुख पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना नामदार पंकजाताई मुंडे असे म्हणाल्या की मी पाच वर्षे पालकमंत्री असताना जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न केले . गावागावात वस्ती वाढयापर्यंत विकासाची कामे पोहचवली आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री असून शिस्तबद्धपणे काम करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यांच्या नेतृत्वात नक्कीच जिल्ह्याच्या विकासाला पुढे घेऊन जाता येईल . मी देखील वेळोवेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी ,पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सामान्य जनतेच्या कामासाठी स्वतंत्रपणे वेळ देणार आहे तेव्हा भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी सक्रियपणे योगदान द्यावे असे विचार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी पंकजाताई पालकमंत्री असताना जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला. ताई मंत्री व्हावे ही जिल्ह्यातील सामान्य लोकांची इच्छा होती ती पूर्ण झाली याचा जिल्ह्यातील जनतेला आनंद होत आहे. आता त्यांच्या माध्यमातून नक्कीच जिल्ह्याचा विकास घडवून आणता येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष मातकर सर व त्यांचे सर्व कार्यकर्ते आणि भाजपा अनुसूचित जाती मोर्चा चे जिल्हाध्यक्ष अजय सवाई, अनिल चांदणे भटक्या विमुक्त आघाडीचे अध्यक्ष लक्ष्मण जाधव ,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उषाताई मुंडे ,मीराताई गांजले ,संगीता धसे , शैलाताई मुसळे विद्यार्थी आघाडीचे चे जिल्हाध्यक्ष संग्राम बांगर ,अल्पसंख्याक मोर्चाचे इरशाद शेख, युवा मोर्चा चे कपिल सौदा गुरव समाज संघटनेचे गणेश पुजारी बंजारा समाज संघटनेचे सुरेश पवार यांनी सर्व कार्यकर्त्यांना समवेत माननीय नामदार पंकजाताईं मुंडे यांचा सत्कार केला . श्रीकांत सानप, राहुल जोगदंड, सुनील मिसाळ, विलास बामणे ,अनिल चांदणे ,अमोल वरतीले संध्याताई राजपूत , संध्याताई मिसाळ , शितलताई राजपूत ,प्रीत कुकडेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक देविदास नागरे यांनी केले

# शेतकऱ्यांच्या व्यथा आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मांडल्या

## नामनिर्देशित सदस्यत्व मिळाल्याने आ.पंडित यांचे जिल्हाभरातून अभिनंदन

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून शासनाने आ.विजयसिंह पंडित यांची नियुक्ती केल्यामुळे त्यांच्यावर जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडून त्यांना न्याय देण्याची मागणी केली. महाऊर्जा कडून पी.एम.कुसूम योजनेत सौर कृषीपंपाच्या वितरणातील अनियमितता, पिक कर्ज देताना राष्ट्रीयकृत बँकांकडून विमा पॉलिसीसाठी होत असलेली आर्थिक पिळवणुक आणि थकीत पिक विमा यांसह विविध विषय आ.विजयसिंह पंडित यांनी बैठकीत मांडले.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.३० रोजी जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री ना.धनंजय मुंडे, पर्यावरण तथा पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बीड जिल्ह्याच्या नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून शासनाने गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांची नियुक्ती केल्यामुळे बैठकीतील त्यांची उपस्थिती अग्रेषित होती. जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

पी.एम.कुसूम योजनेत आवश्यक शुल्क भरणा करून पात्र लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतरही सौरपंप अस्थापित करण्यास होत असलेला विलंब, नादुरुस्त सौरपंप वेळेवर दुरुस्त न करणे, विमा संरक्षित पंपांना विम्याचे संरक्षण न मिळणे, महावितरणकडील प्रतिक्षा यादीत होत असलेली वाढ या सर्व बाबी आ.विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत मांडून महाऊर्जाकडून सौरपंपाच्या संदर्भाने शेतकऱ्यांची होत असलेली अडवणुक थांबविण्याची मागणी केली. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेत खरीप २०१६ साठी उमापूर महसुल मंडळातील १५६२ शेतकऱ्यांनी ४९.२२ लक्ष रुपयांचा विमा हप्ता भरणा करूनही बँक कर्मचाऱ्याच्या चुकीच्या नोंदीमुळे नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळावी यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी न्यायालयीन लढाई लढली. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ७% व्याजदराने नुकसान भरपाई अदा करण्याचे आदेश दिले, हे आदेश सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा कायम ठेवले. मात्र तरीही स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेतून संबंधित शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम अदा होत नसल्याची बाब आ.पंडित यांनी या बैठकीत निदर्शनास आणून दिली. पिक कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत बँकांकडून सर्रास विमा पॉलिसी सक्तिची करून यासाठी शेतकऱ्यांची बँक खाती होल्ड करण्याचे प्रकार होत असल्याची तक्रार यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनी केली.पहिल्यांदाच गेवराई विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करताना जिल्हा नियोजन समितीच्या पहिल्याच बैठकीत आ.विजयसिंह पंडित यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडून त्यांना न्याय देण्याची मागणी या बैठकीत केली. पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी यासंदर्भाने उचित कार्यवाही करण्याचे आश्वासन यानिमित्ताने दिले.

## वृत्तपत्राचा वापर खादयपदार्थ पॅकीगसाठी बंद करा - मिलिंद सरपते

बीड -अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात दि. ०५ ऑगस्ट २०११ पासुन लागु करण्यात आला आहे. सदर कायदयाचा प्रमुख उददेश जनतेस सुरक्षित, सकस व निर्भेळ अन् उपल्ब्ध करुन देणे हा आहे.अनेकदा लोकांमार्फत बाहेरुन नाष्टा मागविला जातो त्यावेळी अन् व्यवसायिक है वडापाव, पोहे या सारखे अन्न पदार्थ न्युजपेपरमध्ये बांधुन देतात त्यामुळे जनतच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. तसेच वृत्तपत्राची शाई ही केमिकल पासुन बनविलेली असते (ड य आयसोब्युटाइल फटालेट आणि ड य इन आयसोब्युटाइल) या केमिकलचा वापर वृत्त पत्र छपाईसाठी करतात. अशा न्युजपेपरमध्ये गरम खादयपदार्थ पॅकींग करणे व ग्राहकांना देणे धोकादायक ठरत आहे. त्यामुळे भारतीय खादय सुरक्षा मानके प्राधिकरण (ऋडड-ख) भारत सरकार यांनी दि. ०६/१२/२०१६ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तरी सर्व अन् व्यवसायिक छोटे मोठे हॉटेल्स, बेकरी व्यवसायिक, स्नॅक्स सेंटर, स्वीटमार्ट, वडापाव, भजी व भेळ विक्रेते यांना सुचित करण्यात येते की, न्युजपेपरमध्ये अन् पदार्थाचे पॅकींग त्वरीत बंद करावे अन्यथा आपणाविरुध्द अन् सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन २०११ अंतर्गत योग्य ती कडक कारवाई घेण्यात यावि आशी विनंती पत्र सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केली आहे

## शिवसेनेच्या ओबीसी सेल जिल्हाध्यक्षपदी धीरज दहिवाळ यांची नियुक्ती : सचिन मुळूक

बीड (प्रतिनिधी)

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशाने शिवसेना प्रणित ओबीसी सेलच्या जिल्हाध्यक्षपदी धीरज दहिवाळ यांची निवड करण्यात आली प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांच्या हस्ते दहिवाळ यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला. दहिवाळ यांच्या निवडीने ओबीसी समाजातील छोटा घटक असलेल्या सोनार समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली असून ओबीसी सेलच्या माध्यमातून धीरज दहीवाळ पक्ष वाढीसाठी काम करत संधीचा सोनं करतील असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला.ओबीसी व्ही जे एन टी सेनेचे प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या विनंतीवरून शिवसेना प्रणित ओबीसी सेलच्या जिल्हाध्यक्षपदी धीरज दहिवाळ यांची नियुक्ती केली. बाळासाहेब भवन मुंबई येथे दहिवाळ यांना प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर, लातूर सह संपर्कप्रमुख रवी गुरमे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले व सत्कार करण्यात आला. यावेळी दहिवाळ यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विचार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावे तसेच अधिकाधिक युवकांना पक्ष संघटनेमध्ये सामील करून घ्यावे





केज -ॲड निखिल बचुटे यांना एल एल बी पदवी प्रदान झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना सरकारी वकील ॲड संतोष देशपांडे,ॲड.शाहु तुपारे,रमेश पवार,दिनकर निकम.

## एसपींचा दणका! गेवराई पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचारी निलंबित!

**पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची कारवाई; गोदापात्रात खळबळ**

**कर्तव्याशी प्रामाणिक न राहणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निलंबनाचा मोठा इशारा**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतर ही काही पोलीस कर्मचारी अवैध धंद्याशी लागेबांध ठेवून आर्थिक उलाढाल करत आहेत. यात गेवराई पोलीस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांनी वाळूत तडजोड करून आपला आर्थिक फायदा साधल्याने पोलीस अधिक्षकांनी या दोघांवर निलंबनाची कारवाई केली. त्यामुळे पुन्हा एकदा गोदापट्टा चर्चेत आला आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत



यांनी यापूर्वीच गोदापात्रातील तिपाले नावाच्या कर्मचाऱ्याची बदली करून आपल्या भूमिका स्पष्ट केल्या होत्या.तसेच वाळू तस्करी रोखण्यासाठी ठोस पाऊले उचलण्या संदर्भात सूचना केल्या होत्या. गेवराई पोलीस ठाण्यातील बलराम सुतार (सहाय्यक फौजदार) आणि अशोक हंबर्डे (पोलीस हवालदार) या दोन कर्मचाऱ्यांनी वाळूच्या दोन टॅक्टरवर कारवाईचे आदेश असताना वाळूसह गाडी न ताब्यात घेता फक्त वाहन ठाण्यात आणून लावले आणि गुन्हा दाखल करण्यासाठी वेळ काढूपणा करत आरोपींना साथ देण्याचे काम केले.त्यामुळे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी थेट गुरुवारी रात्री बलराम सुतार आणि अशोक हंबर्डे या दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन केल्यामुळे गोदापात्रात खळबळ उडाली. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक न राहणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निलंबनाचा मोठा इशारा एसपींनी या कारवाईच्या निमित्ताने जिल्हाभर दिला आहे.

## मोटरसायकल अपघातात तरुणाचा मृत्यू सुर्डी नजिक जवळील घटना

टाकरवन (प्रतिनिधी)

मोटरसायकल अपघातात टाकरवन येथील राजेभाऊ बंडु कदम वय (२३) वर्ष या तरुणाचा जागीच मृत्यू झाला.हि घटना दि.३० गुरवार रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान टाकरवन राजेगाव रोडवरील सुर्डी नजिक जवळ घडली.या दुःखद घटनेने टाकरवन परिसरात शोककळा पसरली होती.

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील राजेभाऊ बंडु कदम वय (२३)वर्ष व मावसभाऊ गणेश तरसे वय १५ वर्ष हे दोघे एम एच ४४ वाय ०१६६ शाईन कंपनिच्या मोटरसायलने टाकरवन येथुन मावशीच्या आष्टी



या गावी आईला आनायला जात आसतांना टाकरवन राजेगाव रस्त्यावरील सुर्डी नजिक येथे मोटारसायकचा आपघात झाला.आपघात भिषेन झाल्याने राजेभाऊ कदम गंभीर जखमी झाला त्याला रुग्नालयात दाखल करताच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.तर गणेश तरसे गंभीर जखमी झाला आसुन त्याच्यावर उपचार सुरु आहेत.अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघात झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.भिषण अपघातात राजूभाऊ बंडू कदम याचा अपघाती दु:खद निधनाची बातमी गावात कळतचा टाकरवन परीसरात शोककळा पसरली.राजेऊ शांत प्रेमळ स्वभाचा तरुन आसल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मानूर ।प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस भास्करराव केदार यांच्या मातोश्री छबुबाई बुवासाहेब केदार यांचे दिनांक २६/ १ /२०२५ रोजी निधन झाले. त्यांचे सांत्वन करण्यासाठी शिवसेनेचे नेते माजी आमदार सुनिलराव धांडे सर यांनी दिनांक ३०/१/२०२५ रोजी त्यांच्या राहत्या घरी येऊन त्यांची भेट घेतली व भास्करराव केदार व केदार परिवाराचे सांत्वन केले.

त्याप्रसंगी त्यांच्या समवेत शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष आजिनाथ खेडकर,

## रूपामाता कारखान्या समोर शेकापचे धरणे आंदोलन

**रूपा माता गुऱ्हाळाकडुन शेतकऱ्यांची लूट खपवून घेणार नाही.. भाई ॲड. नारायण गोले पाटील**

तालखेड (प्रतिनिधी)

माजलगाव तालुक्यातील रोषनपुरी येथील रुपामाता गुळ कारखान्याने शेतकऱ्यांच्या उसाचे व वाहतूक, तोडणीचे पैसे थकवल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून ३१जानेवारी रोजी रुपामाता कारखान्या समोर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. माजलगाव तालुक्यातील रुपामाता गुळ कारखान्याने गतवर्षी सह चालू हंगामातील ऊस उत्पादकांचे, ऊस वाहतूक व ऊस तोडणी ठेकेदारांचे हक्काचे पैसे थकवले असून अनेक शेतकऱ्यांना हक्काचे पैसे न मिळाल्यामुळे रूपामाता गुर्हाळाचा उंबरा झिजवावा लागत आहे, तर अनेक शेतकऱ्यांच्या मुलीचे जमलेली लग्न देखील पुढे ढकलावे लागत आहेत याशिवाय अनेक शेतकऱ्यांना बँकेच्या कर्जाचे हप्ते,खाजगी सावकाराचे कर्ज देणे असल्याने शेतकरी तब्बल दोन महिन्यापासून शेतकरी प्रतीक्षेत आहेत याशिवाय काही शेतकऱ्यांचे गतवर्षीचे पैसे देखील कारखान्याने न दिल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला, असून आज ३१ जानेवारी रोजी कारखान्याच्या गेट समोर



धरणे आंदोलन करण्यात आले या आंदोलनात कारखाना प्रशासन यांच्याविरुद्ध प्रचंड घोषणाबाजी करत बिलांची मागणी करण्यात आली यावेळी पोलीस प्रशासनाने प्रचंड बंदोबस्त लावला होता तर कारखाना प्रशासनाचे प्रतिनिधी भाऊसाहेब गुंड यांनी १५ डिसेंबर पर्यंत बिले देऊन उर्वरित बिले तात्काळ काढण्याबाबत लेखी पत्र दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले, यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड.नारायण गोले पाटील यांनी शेतकऱ्यांची लुट कदापिही खपवून घेणार नसल्याचे सांगत तिव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला यावेळी श्रीराम शेवाळे, बाजीराव नाना ताकट, रंजीत जाधव, विठ्ठल आबा खेत्री, माऊली शिंदे, बापू बेद्रे, वैजनाथ टेकाळे, राजेभाऊ काका उमरीकर, ज्ञानेश्वर ताकट, दगडुबा गुळभिले, विकास टेकाळे, हनुमान डांगे, बिभिषण भोसले आदिंची उपस्थिती होती

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT